सन्माननीय सभासद बंधू भगिनींनो,

केंद्र शासनाने राज्य घटनेत ९७ वी घटना दुरुस्ती करुन सहकार क्षेत्राला घटनात्मक दर्जा दिला आहे. ज्यामुळे देशातील प्रत्येक राज्याच्या सहकारी कायद्यामध्ये सुसूत्रता येवून देशातील सहकार चळवळीला आर्थिक व्यवस्थेत महत्वाचे स्थान प्राप्त करुन दिले आहे.

९७ व्या घटना दुरुस्तीच्या अनुशंगाने, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मध्ये सुधारणांबाबत महाराष्ट्र शासनाने अध्यादेश जारी करुन सदर बदल दिनांक १४-०२-२०१३ पासून सर्व सहकारी संस्थांना लागू केलेले आहेत.

त्याअनुशंगाने सहकार खात्याने आदर्श उपविधी तयार करुन त्यांच्या संकेतस्थळी उपलब्ध करुन दिलेल आहेत व सर्व नागरी सहकारी बँकांना सदरहू आदर्श उपविधी दिनांक १५-०४-२०१३ पर्यंत स्विकृत करण्यास सांगितलेले आहे. सहकार खात्याने तयार केलेल्या आदर्श उपविधी मध्ये आपल्या बँकेने काही सुसंगत बदल सुचविलेले आहेत. सदर बदलांसह आदर्श उपविधी आपल्या बँकेस स्वीकृत करावयाचे आहेत.

स्वीकृत करावयाच्या आदर्श उपविधी मधील काही महत्वाचे बदल

१. सध्या असलेली भाग भांडवल रक्कम रु. १००/- कायम ठेवून सर्वसाधारण सभासदांसाठी कमीत कमी रु. १,०००/- चे भाग भांडवल घेण्याची तरतूद करण्यात आलेली आहे.

२. क्रियाशील (Active Member) सभासद होण्यासाठीच्या अटी
   i) कमीत कमी रु. ३,०००/- चे भाग भांडवल
      आणि
   ii) कमीत कमी ठेव रक्कम रु. ३०,०००/-
      किंवा
      कमीत कमी कर्ज रक्कम रु. १,००,०००/-

   iii) मागील सलग ०५ वर्षात कमीत कमी एकदा वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहणे.

३. नवीन सुचविलेल्या उपविधोनुसार संचालक मंडळ सदस्यांची संख्या १८ ठेवण्याचे सुचवित आहोत, त्यापैकी १२ सदस्य हे सर्वसाधारण वर्गातील असतील त्यामध्ये दोन व्यावसायिक अर्हता असणा-या सदस्यांचा समावेश असेल व ०५ सदस्य राखीव वर्गातील असतील आणि एक क्रियाशील संचालक असेल. या व्यतिरीक्त दोन तज्ञ सदस्यांना संचालक मंडळात सामावून घेण्याची तरतूद आहे.

संचालक मंडळाच्या वतीने आपणांस मी आग्रहपुर्वक विनंती करत आहे की, बँकेच्या प्रत्येक सभासदाने क्रियाशील सभासद होण्यासाठी वरीलप्रमाणे घालून दिलेल्या अटींची लवकरात लवकर पुर्तता करावी.

आपला नम्र,
श्री. काशिनाथ दि. मोरे
(अध्यक्ष)